# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, परभणी

## (महसूल विभाग)

Email ID- rdc.parbhani@maharashtra.gov.in Ph. No.02452-223702

वाचा :- 1) शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे निर्णय क्र.टंचाई-1099/प्र.क्र.12/ पापु-14, दिनांक 3/2/1999

2) शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे परिपत्रक क्र.ग्रापापु/101/प्र.क्र./436 पापु दिनांक 10/11/2001

3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे पत्र क्र.जिपप/तां1/टंचाई/नविविहास/72/19, दिनांक 15/2/2019 (या कार्यालयास प्राप्त दिनांक 22/2/2019)

जा.क्र.2019/आरबी/डेस्क/पाटं/सिआर-74 दिनांक 05/03/2019

विषय :- पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नविन विंधन विहीर उपायोजनास मंजुरी देणे बाबत

## ::आ दे श::

ज्याअर्थी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी संदर्भीय पत्र क्र.3 अन्वये परभणी जिल्हयातील खाली नमुद केलेल्या गाव/वाडी/वस्ती तांडा येथे पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणासाठी नविन विंधन विहीर ही उपाययोजना घेण्याची शिफारस केली आहे. सहायक भूवैज्ञानिक, ग्रा.पा.पु.वि., जि.प., यांनी क्षेत्रीय तपासणी अंती किमान खर्चाची व तांत्रिकदृष्ट्या शक्य उपाययोजना असल्याची खात्री करुन प्रपत्र-ब शिफारस केलेली आहे. सदरील प्रपत्र-ब वरील शिफारशीसी संबंधीत तहसिलदार व गट विकास अधिकारी, पं.स. यांनी सहमती दर्शविली आहे. नविन विंधन विहीरीसाठी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक उपअभियंता (यांत्रिकी), ग्रा.पा.पु.वि.,जि.प., परभणी यांनी तयार केले असुन त्यास कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि., जि.प., परभणी यांची मान्यता आहे.

02. त्याअर्थी शासनाचे संदर्भीय निर्णयान्वये प्राप्त अधिकारानुसार मी जिल्हाधिकारी, परभणी खालील गाव/वाडी/तांडा/वस्ती मध्ये पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नविन विंधन विहीर घेण्याच्या उपाययोजनास खालील अटी व शर्तीस अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तालूका | गावाचे नांव | नविन विंधन विहीरची संख्या | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | सोनपेठ | पोंडुळ | 01 | 58196.00 |
| 2 | सोनपेठ | भुकत्तरवाडी | 01 | 58196.00 |
| 3 | सोनपेठ | भाऊ तांडा | 01 | 58196.00 |
| 4 | सोनपेठ | मरगळवाडी | 01 | 58196.00 |
| 5 | सोनपेठ | बनवाडी | 01 | 58196.00 |
| 6 | सोनपेठ | धामोनी तांडा | 01 | 58196.00 |
| 7 | सोनपेठ | वडगाव तांडा | 01 | 58196.00 |
| 8 | सोनपेठ | दुधगाव | 01 | 58196.00 |

Email ID- rdc.parbhani@maharashtra.gov.in Ph. No.02452-223702

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | सोनपेठ | थडीउक्कडगाव | 01 | 58196.00 |
| 10 | सोनपेठ | गोळेगाव | 01 | 58196.00 |
| 11 | सोनपेठ | निमगाव | 01 | 58196.00 |
| 12 | सोनपेठ | कान्हेगाव | 01 | 58196.00 |
| 13 | सोनपेठ | डोंबेवाडी तांडा | 01 | 58196.00 |
| 14 | पूर्णा | खरबडा | 01 | 58196.00 |
| 15 | पूर्णा | सातेफळ | 01 | 58196.00 |
| 16 | पूर्णा | लिमला | 01 | 58196.00 |
| 17 | पूर्णा | मुंबर | 01 | 58196.00 |
| | | एकूण | 17 | 989332.00 |

अटी व शर्ती :-

1) मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली जनहित याचिका 36/2009 अन्वये दिलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि., जि.प., परभणी यांची राहिल.
2) स्थळ निश्चित केलेल्या ठिकाणीच नविन विंधन विहीर घेण्यात याव्यात. विंधन विहीरीचे काम हातपंप उभारणीसह तीन दिवसात पुर्ण करावे व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. त्यासोबत नोटकॅम ॲप मध्ये लॉंगीट्युड व लॅटीट्युड नमुद असलेले संबंधीत अभियंता/कर्मचा-यासह फोटो सादर करावा.
3) विंधन विहीर खुदाईचे काम शासकीय विंधन यंत्राद्वारे प्रथम प्राधान्याने करण्यात यावे. शासकीय विंधन विहीर खुदाई यंत्र उपलब्ध होत नसल्यास नोंदणीकृत कंत्राटदारामार्फत पुर्ण करण्यात यावे.
4) वाडी/वस्ती/तांडा यांची लोकसंख्या किमान 50 असावी तसे 1.00 कि.मी. अंतराच्या परिसरात कोणत्याही पिण्याचे पाण्याचा उद्भव असु नये.
5) कोणत्याही परिस्थितीत मोठ्या खातेदाराच्या अथवा खाजगी वस्तीसाठी विंधन विहीर घेण्यात येऊ नयेत.
6) महाराष्ट्र भूजल अधिनियम (विकास व व्यवस्थापन) 2009 ची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.
7) शासन सुचना नुसार नविन विंधन विहीर खुदाई 60 मिटर पर्यंतच घेण्यात यावी.
8) नविन विंधन विहीर घेण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. परभणी यांच्या मार्फत घेण्यात यावा.
9) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी संदर्भीय शासन निर्णय दि.3/2/1999 मधील बाबत 4 परंतु (III) मधील निर्देशानुसार शासनाचे इतर फंडातुन निधी उपलब्ध होत नसल्याची खातरजमा करुनच टंचाई अंतर्गत उपाययोजना घेण्यात याव्यात.
10) शासन निर्णय दिनांक 3/2/1999 मधील (4) मध्ये विंधन विहीरी बाबत नमूद बाबींची खात्री मु.का.अ., जि.प., परभणी यांनी करावी.
11) गावांत शेवटच्या जनगणनेनुसार 200 लोकसंख्येमागे 1 विंधन विहीर अनुज्ञेय राहील. या तत्वास अनुसरुन गावाच्या लोकसंख्येच्या आणि पूर्वी घेतलेल्या आणि सद्यस्थितीत जिवंत विंधन विहिरींच्या संख्येचा विचार करुन नविन विंधन विहिरीचे काम प्रत्यक्ष सुरु करण्यापुर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी खात्री करावी त्यानंतरच काम सुरु करावे.
12) वाड्यांची लोकसंख्या शेवटच्या जनगणनेनुसार किमान 50 असल्यास, 1 विंधन विहिरी अनुज्ञेय राहील. सदर वाडीच्या 0.5 कि.मी. अतराच्या परिसरात कोणताही पिण्याच्या पाण्याचा सार्वजनिक उद्भव असू नये. तसेच सदर वाडी कायम स्वरुपाची असुन तिचा समावेश शेवटच्या जनगणनेमध्ये वाडी म्हणुन असावा. (जनगणनेच्या

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, परभणी

## (महसूल विभाग)

Email ID- rdc.parbhani@maharashtra.gov.in Ph. No.02452-223702

पुस्तिकेत वाडीचा निर्देश नसल्यास, जिल्हाधिका-यांनी सदर वाडी कायम स्वरुपी किंवा ती शेवटच्या जनणनेनंतर कायम स्वरुपी अस्तित्वात आली आहे असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.) याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी केल्यानंतरच पूढील कार्यवाही करावी. तसेच मोठ्या खातेदरांच्या खाजगी वस्त्यांसाठी विंधन विहिरी घेण्यात येऊ नयेत.

13) नविन विंधन विहीर घ्यावयाच्या जागेचे काम सुरु करण्यापुर्वीचे व हातपंप बसविल्यानंतर नोटकॅम ॲपद्वारे लॉगीट्युट ऑटीट्युटसह दिनांक व वेळ नमुद असलेले फोटो दाखल केले असल्याची खात्री मु.का.अ., जि.प. , परभणी यांनी केल्यानंतरच निधी वितरीत करण्यात यावा.

14) नविन विंधन विहीर/बोअर घेतल्यानंतर पुरेसे पाणी लागल्यानंतर गावासाठी अधिग्रहीत केलेली खाजगी विहीर/बोअरचे अधिग्रहण किंवा टॅंकर त्वरीत बंद/रद्द करण्यासाठी संबंधीत तहसीलदार यांना करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत करण्यात यावी.

15) अंदाजपत्रकातील नमुद साहित्याच्या दराची GeM पोर्टल वरील दराशी तुलना करुन त्याअनुषंगाने कंत्राटदाराशी वाटाघाटी करुन कमी दरावर नविन विंधन विहीरीच्या साहित्यांची खरेदी करुन कामे पूर्ण करण्यात यावीत.

03. सदरहू खर्च "मागणी क्र.सी-6, 2245- नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, 01- अवर्षण, 102, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, (91), राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानूसार खर्च, (91) (01), पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (2245 0093) (दत्तमत) (वेतनेतर) 31, सहायक अनुदाने" व "मागणी क्र.सी-6, 2245-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, 01-अवर्षण, 102, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, (92) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या कामनाकनूसार खर्च, (92) (01), पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (2245 2185) (दत्तमत) (वेतनेतर) 31, सहायक अनुदाने" या लेखाशिर्षामध्ये भागवावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

[Sign by DSC]
(पी. शिवशंकर)
जिल्हाधिकारी, परभणी

प्रत - आवश्यक कार्यवाहीस्तव

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी
2) कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी
3) राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, जि.अ.का., परभणी यांना उक्त आदेशाची प्रत संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यास्तव.
4) उप विभागीय अधिकारी, पाथरी/गंगाखेड
5) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, परभणी
6) संबंधीत उपविभागीय अधिकारी, ग्रा.पा.पु.उपविभाग, सेलू/गंगाखेड/ (मार्फत का.अ., ग्रा.पा.पु.वि., जि.प., परभणी)
7) उपअभियंता (यांत्रिक), ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी
8) तहसिलदार, सोनपेठ/पूर्णा
9) [illegible]कास अधिकारी, पंचायत समिती, सोनपेठ/पूर्णा

Signature Not Verified
Digitally signed by P SIVA SANKAR
Date: 2019.03.08 10:42:36 IST
Reason: Approved